**स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल (Special Environment Surveillance Task Force) यांची प्रथम बैठक दि. १८/०७/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता जिल्हाधिकारी बीड यांच्या दालनात झालेल्या स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाच्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाचा शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८ अन्वये प्रदूषित नदी पट्टयातील प्रदूषण रोखण्याकरीता बीड जिल्ह्यासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Force) प्रथम बैठक दुपारी १.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात घेण्यात आली. सदर बैठकीस खालील दलातील सदस्य / प्रतिनिधी उपस्थित होते.

१. मा. जिल्हाधिकारी, बीड
२. सचिव, विधीसेवा प्राधिकरण, **बीड**
३. जिल्हा खनिकर्म अधिकारी, बीड
४. पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, बीड
५. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना
६. मुख्याधिकारी, नगरपालिका,बीड
७. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, बीड यांचे प्रतिनिधी-**उपअभियंता**
८. क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना

प्रथमत: श्री. प.ब.हजारे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना यांनी महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाचा शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८ नुसार स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची माहिती दिली व त्यांच्या कार्यकक्षेबाबत माहिती सर्व उपस्थितांना अवगत करुन दिली. तसेच असे सांगितले की दि. १७/०१/२०१८ च्या दैनिक दि हिंदूमध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांनी मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. हरीत लवादाने सदर प्रकरणी दि. २०/०९/२०१८ रोजी आदेश पारीत करतांना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राधान्य क्र. **I** ते **V** यामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आलेला असून यामध्ये बींदूसरा नदीवरील बीड शहरातील स्वराज्य नगर ते स्नेह नगर हा पट्टा प्राधान्य क्र. **IV** मध्ये असल्याचे सांगितले **तसेच** नगरपालिकेकडे अद्याप घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा **(Sewage Treatment Plant)** व सांडपाणी गोळा क**रण्या**ची यंत्रणा अस्तित्वात नसल्याचे सांगितले.

मा. जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका मुख्याधिकारी, श्री. बीघोत यांना **(Sewage Treatment Plant)** उभारणी बाबत विचारले असता त्यांनी असे सांगितले की या बाबत ३५ **MLD** क्षमतेच्या **STP** ची **Work Order जूलै २०१८ मध्ये** झालेली असून महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हे काम करत असल्याचे सांगितले. मा. जिल्हाधिकारी यांनी कामाच्या सद्यस्थितीबाबत विचारले असता १० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगितले व यामध्ये सध्या फक्त सांडपाणी गोळा करण्याच्या यंत्रणेचे **(under ground drainage system)** काम चालु असल्याचे सांगितले. यावर मा. अध्यक्ष यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांच्या प्रतिनिधीस विचारले असता त्यांनी असे सांगितले की सध्या पावसाळा सुरु असल्यामुळे मजूर भेटत नाहीत म्हणून काम सावकाश चालु आहे. असे सांगितले तसेच **STP** उभारण्यासाठी त्यांना नगरपालिकेने अद्याप जागा हस्तांतरीत केली नसल्याचे सांगितले.

..२..

यावर मा. जिल्हाधिकारी यांनी काम संथगतीने सुरु असल्यामुळे व नगरपालिकेने अद्याप जागा हस्तांतरीत केली नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली.

मा.जिल्हाधिकारी यांनी मुध्याधिकारी बीड यांना जागा हस्तांतराबाबत विचारले असता त्यांनी सदर जागा २ -३ दिवसामध्ये महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येईल असे सांगितले.

मा. जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांना सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल या बाबत दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या व असेही सांगितले की जर नियुक्त केलेली **Agency** कामात दिरंगाई करत असेल तर त्यांची **Work Order** रद्द करुन दुसरी **Agency ने**मावी व सांडपाणी प्रक्रिया केंद्र व सांडपाणी गोळा करण्याची यंत्रणा निर्धारित वेळेत पूर्ण होईल हे पहावे अशी सूचना केली जेणे करुन मा.हरित लवादाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही.

मा. जिल्हाधिकारी यांनी **STP** उभारणी कामाच्या संथ प्रगतीमुळे मुख्याधिकारी यांना नाराजीवजा पत्र त्यांचे सहीने पाठवण्याच्या सूचना उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांना **दिल्या.**

मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना सदर प्रदूषित पट्टयामध्ये वाळु उत्खनन होते का असे विचारले असता त्यांनी सदर पट्टयामध्ये वाळू उत्खनन होत नसल्याचे सांगितले.

सदस्य सचिव/समन्वयक यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून मा. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

जिल्हाधिकारी,बीड